विस्तार अधिकारी (कृषि) या संवर्गातील
कर्मचाऱ्यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत
आश्वासीत प्रगती योजनेचे लाभ देणे बाबत.

जिल्हा परिषद, अहिल्यानगर
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. कृषि/आस्था/१८९/२०२४
अहिल्यानगर दि०८/०४/२०२५

संदर्भ :- १. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दिनांक.०२/०३/२०१९
२. गठीत निवड समितीचे इतिवृत्त दि. ०३/०२/२०२५

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू.५४००/-या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचाऱ्यांना लागू केली आहे. सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या अटी व शर्ती याबाबत व सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करून उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विस्तार अधिकारी (कृषि) यांना गट क तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा खालिल प्रमाणे नमूद केलेनुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर ज्या अधिका-यांचा गट-ब मधील पदोन्नातीचा विकल्प महाराष्ट्र विकास सेवा वर्ग २ (सहाय्यक गट विकास अधिकारी) तसेच महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग २ (कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) गट ब (कनिष्ठ (राजपत्रित) ) या पदाचा आहे.त्यांना वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-१५ रू. ४१८००-१३२३०० खालील अटी व शर्तीना अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यालयाचे नाव | पहिला लाभ मंजुर करणेचा दिनांक | दुसरा लाभ मंजूर करणेचा दिनांक | तिसरा लाभ मंजुर करणेचा दिनांक | सु.से.आश्वासित प्रगति योजनेचा लाभ मंजूर केलेल्या पदाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री बाळासाहेब कारभारी साबळे | पंचायत समिती कोपरगांव | - | - | १३/१२/२०२० | सहा.गट विकास अधिकारी |
| २ | श्री सुनिल विठ्ठल मिसाळ | पंचायत समिती जामखेड | - | - | १६/०९/२०२१ | सहा.गट विकास अधिकारी |
| ३ | श्रीम स्वाती वसंतराव थिगळे | पंचायत समिती नेवासा | - | - | १७/०४/२०२३ | सहा.गट विकास अधिकारी |
| ४ | श्री संजय बाबासाहेब कराळे | पंचायत समिती पाथर्डी | - | - | ०२/०९/२०२३ | सहा.गट विकास अधिकारी |
| ५ | श्री काकासाहेब पोपटराव खोसे | पंचायत समिती श्रीगोंदा | ०८/०८/२०२३ | - | - | कृषि अधिकारी (जि.प.) गट-ब कनिष्ठ)(राजपत्रित) |

| अ.क | पदाचे नाव | ६ वे वेतन आयोगातील वेतन बँड | ७ वे वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विकास सेवा वर्ग २ (सहाय्यक गट विकास अधिकारी) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | एस-१५ ४१८०० - १३२३०० |
| २ | महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग २ (कृषि अधिकारी) (जिल्हा परिषद )गट ब (कनिष्ठ (राजपत्रित) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | एस-१५ ४१८०० - १३२३०० |

योजनेच्या अटी व शर्ती

१. संबंधित कार्यालय प्रमुख यांनी कर्मचाऱ्यांचे सलग सेवेचे दाखले, अर्हता परिक्षा, संगणक परिक्षा, स्थायित्व प्रमाणपत्रे, जातवैधता प्रमाणपत्रे, मत्ता व दायित्वे विवरणपत्रे, चौकशी बाबतची व इतर सादर केलेल्या दस्तऐवजांनुसार संबंधित कर्मचाऱ्यांना लाभ अनुज्ञेय आहे. याबाबतची खात्री संबंधित खातेप्रमुखांनी करून वेतननिश्चिती करावी.

२. सातव्या वेतन आयोगामधील वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू राहील. म्हणजेच संबंधित कर्मचारी वेतनस्तर २१ मध्ये वेतन आहरीत करू लागतील तेव्हा त्यांना या योजने अंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३. या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना संपुर्ण सेवा कालावधीत पात्रतेनुसार फक्त तीन वेळा लाभ मंजूर करण्यात येईल.

४. सदर योजनेचा लाभ हा कर्मचाऱ्यांना संपुर्ण सेवा कालावधीत (म्हणजेच ३० वर्ष नियमित व सलग सेवा केलेल्या)दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना एक लाभ अनुज्ञेय राहील. ३० वर्षाच्या नियमित व सलग सेवेत कार्यात्मक पदोन्नती व लाभांची संख्या तीन पेक्षा जास्त नसावी याची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखांनी करावी.

५. संपुर्ण सेवा कालावधीत तीन कार्यात्मक पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा एकही लाभ अनुज्ञेय नाही.

६. सदर योजने अंतर्गत पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर मंजूर करण्यात येत असल्यामुळे त्यासाठी पदोन्नतीच्या पदाचे सर्व निकष पुर्ण करणे आवश्यक राहील.

७. यापुर्वी ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती अथवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे ते लाभ हे या योजनेअंतर्गत प्रकरण परत्वे पहिला व दुसरा लाभ समजण्यात येईल.

८. विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधीत पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक तत्सम उच्च वेतन संरचनेचा मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल.

९. ज्या कर्मचाऱ्यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाचा विवक्षित सेवा कालावधीनंतर त्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

१०. ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ ते ०२/०३/२०१९ या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ किंवा २४ वर्षाच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे यापुर्वीचे १२/२४ वर्षाच्या लाभाचे यापुर्वीचे आदेश रद्द करण्यात येत असून तीन लाभांच्या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ सुधारीत करून मंजूर करण्यात येत आहेत. त्यानुसार असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रक्कमेशी समायोजित करण्यात येवून फरकाची रक्कम देय असल्यास अनुज्ञेय करावी.

११. ज्या कर्मचाऱ्यांच्या नियमित व सलग सेवेची १० वर्ष दि.३१/१२/२०१५ पुर्वी किंवा दि.३१/१२/२०१५ रोजी पुर्ण होतील, त्यांना या योजनेअंतर्गत तीन लाभांच्या योजनेचा पहिला लाभ दि.०१/०१/२०१६ रोजी पात्रतेनुसार मंजूर केला जाईल.

१२. ज्या कर्मचाऱ्यांची २० वर्षाची सेवा ही दि.०१/०१/२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पुर्ण होईल त्यांना तिसरा लाभ हा दुसऱ्या लाभापासून पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

१३. दि.०१/०१/२०१६ व नंतरच्या पदोन्नतीच्या वेळी म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम २०१९ या अधिसुचनेतील नियम क्र.१३ नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्याने त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेत वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

१४. दि.०१/०१/२०१९ पुर्वी सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१९ रोजी व नंतर तीन लाभांच्या योजनेतील यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

१५. तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही दि.०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आली असल्याने जे कर्मचारी यापुर्वीच्या योजनेनुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेवून दि.०१/०१/२०१६ पुर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त/मयत झाले आहेत, त्यांना यथास्थिती १२ +८ व २४+६ याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. तथापि जे कर्मचारी कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना/सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना यांचा यथास्थिती पहिला/दुसरा लाभ हा दि.३१/१२/२०१५ पुर्वी प्राप्त होवून ते दि.०१/०१/२०१६ रोजी किंवा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त/मयत झाले आहेत, त्यांना त्यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस/मृत्यूच्या तारखेस पुर्ण होत आहे, अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार दुसरा/तिसरा लाभ अनुज्ञेय राहील.

१६. तीन लाभांच्या योजनेअंतर्गत संबंधित कर्मचाऱ्यांस पहिला/दुसऱ्या/तिसऱ्या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी, गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील सुधारीत शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ मध्ये विहीत केल्यानुसार राहील.

१७. कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यास भविष्यात होणाऱ्या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यात्मक स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, विहीत अटी व शर्तींच्या पुर्ततेनुसार या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

१८. सदर योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर करताना संबंधित मागास कर्मचाऱ्यास जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१९. या योजने अंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून म.ना.से.(वेतन) नियम १९८१ अमधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

२०. उक्त नमूद विस्तार अधिकारी (कृषि) यांचे गट व मधील पदोन्नती विकल्पानुसार त्यांना अनुज्ञेय वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

२१. संबंधित कर्मचाऱ्यांना छोटया कुटुंबाच्या व्याख्येनुसार दोनच अपत्ये आहेत, या अटीवर लाभ मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि संबंधित कार्यालय प्रमुखांनी वेतन निश्चिती करतांना याबाबतची खात्री करावी. दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांना अपात्र करण्यात येवून वरीलप्रमाणे मंजूर केलेला लाभ देण्यात येऊ नये, व वैयक्तिक माहिती लपवून ठेवल्याने त्यांचेवर उचित शिस्तभंगाची कारवाई करावी.

२२. संबंधित कर्मचाऱ्यांकडून भविष्यात प्राप्त होणाऱ्या प्रचलित शासन निर्णयानुसार व लेखा परिक्षणामध्ये वेतन श्रेणीबाबत अतिप्रदाना संबधीत वसूली निघाल्यास सदर वसूली करण्याची जबाबदारी संबंधीत खातेप्रमुखांची राहील. तसेच अशा प्रकारची वसूली करून देण्यास सहमती असलेबाबत अशा आशयाचे बंधपत्र घेवून वेतन निश्चिती करण्यात यावी.

२३. संबंधीताकडून करारनामा करून घेणेकामी नमूना जोडला आहे.

२४. सदर आदेशाची कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकात नोंद घेणेत यावी व सदर आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र 202504090005 असा आहे.

Signed by
Sambhaji Bhagwantrao Langore
Date: 09-04-2025 13:42:38

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,
संबंधित कर्मचारी
यांना कार्यालय प्रमुखामार्फत रवाना

प्रत- १.गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगांव/जामखेड/पाथर्डी/श्रीगोंदा/नेवासा
२.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. निवड नस्ती